# 'विवेकानंद' मध्ये विद्यार्थ्यांचा मेळावा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. शिर्के म्हणाले, 'विवेकानंद कॉलेजमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले अनेकजण उद्योगपती, राजकारणी, अधिकारी, शिक्षक, खेळाडू, लेखक, कवी, कलावंत, सैन्यात अधिकारी झाले. ही वाटचाल गौरवास्पद आहे'

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. कॉलेजच्या पहिल्या १९६४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. माजी महापौर महादेवराव आडगुळे, प्रा. रमेश जाधव, पी. सी. पाटील, ऋतुराज क्षीरसागर, आर. एस. भोगम, पंकज रजपूत यांची भाषणे झाली. आर. एस. भोगम लिखित 'माझा जीवनप्रवास' पुस्तकाचे प्रकाशन झाले. शाहीर आझाद नाईकवडी, डॉ. शरदचंद्र साळुंखे, प्रा. नंदकुमार रानभरे उपस्थित होते. प्रा. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

# संस्कारक्षम पिढीचे बापूजी नंदादीप : प्राचार्य पाटणे

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. २४ : ''ज्ञान, विज्ञानाने प्रगत आणि संस्कारमूल्याने संपन्न माणूस घडविण्यासाठी डॉ. बापूजी साळुंखे यांनी विवेकानंदांच्या आदर्शवादी तत्त्वज्ञानाला अनुसरून विवेकानंद शिक्षण संस्था उभारली. खेड्यांतील व शहरांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे शैक्षणिक व सामाजिक जडणघडण करणारे संस्कारक्षम पिढीचे नंदादीप आहेत,'' असे मत प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञान संस्कृतीचे दूत' विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे.

डॉ. पाटणे म्हणाले, ''डॉ. बापूजी साळुंखे यांनी विचारवंतांच्या अनेक पिढ्या घडविल्या आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतून लाखो विद्यार्थी देश-विदेशात कार्यरत आहेत. साधी राहणी व उच्च विचारसरणी, अंतःकरणाची शुद्धता, विवेकवादीदृष्टी आणि समाजाविषयी असणारी आत्मीयता यामुळे बापूजींनी आदर्श ठेवला आहे. संस्थेची प्रार्थना एक विश्वप्रार्थना असून, त्यामध्ये बापूजींनी घालून दिलेली पंचशील तत्त्वप्रणाली म्हणजे एक जीवन विचारधारा आहे.''

श्री साळुंखे म्हणाले, ''बापूजींच्या तत्त्वज्ञानाचा व कार्याचा प्रभाव समाजावर पडल्याने समाजातील थोर विचारवंत व कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी उभे राहिले. शिक्षणातून त्यागमय वृत्तीने समाजाची सेवा करणारे डॉ. साळुंखे एक विद्यार्थीप्रेमी, शिक्षकप्रेमी, समाजसुधारक आणि देशभक्त होते.''

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. प्रास्ताविक विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. प्रा. बी. के. गोसावी यांनी आभार मानले. प्रा डॉ. प्रभावती पाटील व समीक्षा फराकटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, डॉ. शरदचंद्र साळुंखे, बाबासाहेब मोहिते उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
25/01/2019 Page No. 4

सकाळ

# विद्यापीठात आज बस पासचे वाटप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या (ता. २५) प्रातिनिधिक स्वरूपात आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनी व निवडक प्राचार्यांना बस पासचे वाटप होणार आहे. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी अडीच वाजता कार्यक्रम सुरू होईल. आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी योजना सुरू करण्याचा मानस जाहीर केला होता. त्यासाठी समाजातील विविध घटकांना मदतीचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून पालकमंत्री चंद्रकांत पाटील विद्यापीठाला नऊ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करणार आहेत.

Kolhapur, Main
25/01/2019 Page No. 5

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2019
तरुण भारत



आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत यश संपादन केलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर :** चंदीगढ, पंजाब येथे झालेल्या आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश संपादन केले. स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने सुवर्ण पदकाची कमाई केली. संघामध्ये प्रभंजन व्यायाम मंदिरचे सुशांत पाटील, कुणाल दर्वान, केतन चिंचणे आदी खेळाडूंचा समावेश होता. तसेच सुशांत पाटील याने वैयक्तीक प्रकारात रौप्य आणि कास्यंपदक पटकाविले. तर दोरी मल्लखांबामध्ये शिरीन शेख हिने तृतीय स्थान मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. रेवती हिरेमठ, सागर हिरेमठ, गुरुशांत हिरेमठ, चंद्रकांत पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.